# RESCON 2026

## Media Coverage

Bharati Vidyapeeth Medical College & Hospital, Pune

# डॉक्टर को जीवन भर छात्र बने रहना चाहिए : डॉ. अभिजात

■ **पुणे, (सं.)** नेशनल मेडिकल कमीशन के अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ ने कहा कि एक डॉक्टर को जीवन भर छात्र की तरह सीखते रहना चाहिए. निरंतर सीखने से प्राप्त अत्याधुनिक ज्ञान मरीजों को सर्वोत्तम उपचार प्रदान करने में सहायक होता है. वे भारती विद्यापीठ के मेडिकल कॉलेज में '21वीं वार्षिक अनुसंधान परिषद' के उद्घाटन अवसर पर बोल रहे थे. प्र-कुलगुरु डॉ. विश्वजीत कदम ने ग्रामीण क्षेत्रों में चिकित्सा सुविधाओं की कमी पर चिंता व्यक्त करते हुए डॉक्टरों की संख्या बढ़ाने की आवश्यकता पर बल दिया.



# वैद्यकीयच्या पदव्युत्तर जागा वाढणार

## डॉ. अभिजात शेठ यांची माहिती

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**



**एनएमसीतर्फे डॉक्टरांना एआय प्रशिक्षण देण्यात येत आहे. मोठ्या संख्येने डॉक्टर तयार होत असताना त्यांना ठरावीक कौशल्य मिळाल्यानंतरच पुढील सनद देण्याचे धोरण भविष्यात राबवण्याचा विचार आहे. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील गुणवत्ता टिकून राहण्यास मदत होईल.**

**– डॉ. अभिजात शेठ,** अध्यक्ष, राष्ट्रीय वैद्यकीय आयोग

'भारतात पदवी (एमबीबीएस) आणि पदव्युत्तर (पीजी) शिक्षणाच्या जागांमध्ये तफावत असून, अनेक वर्षांपासून एमबीबीएसच्या तुलनेत पदव्युत्तर पदवीच्या (एमएस, एमडी) जागा कमी आहेत. ही दरी कमी करण्यासाठी भविष्यात एमबीबीएस आणि पदव्युत्तर जागांचे प्रमाण समान करण्याचा विचार केला जात आहे,' अशी माहिती राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे (एनएमसी) अध्यक्ष अभिजात शेठ यांनी शुक्रवारी दिली. ब्रिटनससह विकसित देशांमध्ये पदव्युत्तर विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयातर्फे एकविसाव्या वार्षिक संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेच्या उद्घाटनावेळी डॉ. शेठ बोलत होते. या वेळी कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह व प्र- कुलगुरू डॉ. विश्वजित कदम, भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालक डॉ. अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर, वैद्यकीय संचालक डॉ. संजय ललवाणी उपस्थित होते.

'वैद्यकीय क्षेत्रात सुपर स्पेशालिटी आणि सब-स्पेशालिटी शाखांची मागणी झपाट्याने वाढत आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधनामुळे उपचारपद्धती अधिक अचूक होत आहे. त्यामुळे भविष्यात डॉक्टरांची गरज अधिक वाढणार आहे. देशात वैद्यकीय सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास होत आहे. जागा वाढल्यामुळे अधिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेता येत आहे. शहरांमध्ये डॉक्टरांची संख्या जास्त आहे, तर ग्रामीण आणि दुर्गम भागांत कमतरता आहे. डॉक्टरांची संख्या वाढवणे आणि वैद्यकीय सेवा सर्वत्र पोहोचवणे हे धोरणकर्त्यांसमोरील उद्दिष्ट आहे,' असेही डॉ. शेठ म्हणाले.

प्रभात




पुणे : भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित २१ व्या वार्षिक संशोधन परिषदेचे उद्घाटन डॉ. अभिजात शेठ यांच्या हस्ते झाले. या वेळी कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह व प्र-कुलगुरू डॉ. विश्वजीत कदम, कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर आणि मेडिकल डायरेक्टर डॉ. संजय ललवाणी.

# ...तरच डॉक्टरांना प्रॅक्टिसची सनद!

## डॉ. अभिजात शेठ; भारती विद्यापीठात वार्षिक संशोधन परिषद

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १३ - देशातील आरोग्य व्यवस्था सर्वसामान्यांपर्यंत समप्रमाणात पोहोचवण्यासाठी समाजाला असंख्य डॉक्टरांची गरज आहे. मात्र, केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून, भावी डॉक्टरांना एका विशिष्ट कौशल्याची कसोटी पार करावी लागेल. हे कौशल्य आत्मसात केल्याशिवाय त्यांना पुढील सनद प्राप्त करता येणार नाही, असे धोरण भविष्यात राबवण्याचा नॅशनल मेडिकल कमिशनचा मानस आहे, असे महत्त्वपूर्ण प्रतिपादन कमिशनचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी येथे केले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित २१ व्या वार्षिक संशोधन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. शेठ बोलत होते. या वेळी कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह व प्र-कुलगुरू डॉ. विश्वजीत कदम, भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर आणि मेडिकल डायरेक्टर डॉ. संजय ललवाणी उपस्थित होते.

डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात आजही वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. ग्रामीण भागातील रुग्णांनाही शहरांप्रमाणेच उच्च दर्जाच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत. कुलगुरू डॉ. विवेक सावजी यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांनी चौकटीबाहेर जाऊन आंतरविद्याशाखीय संशोधन करावे, असे आवाहन केले. या सोहळ्यात ३५ वर्षे वैद्यकीय अध्यापन करून अनेक डॉक्टर्स घडविणाऱ्या डॉ. मीरा मोडक व डॉ. अरुंधती दिवाण यांचा सन्मान करण्यात आला. प्राचार्य डॉ. करमरकर यांनी अहवाल सादर केला. याप्रसंगी हॉस्पिटलमधील अद्ययावत व नव्याने समाविष्ट केलेल्या विभागांचे उद्घाटनही करण्यात आले. संयोजन डॉ. सुप्रिया बारसोडे, डॉ. जिग्नेश शहा, डॉ. महादेवन कुमार आदींनी केले.

स्नेहप्रकाश

1-4
14 Mar 2026

# डॉक्टर हे आजीवन विद्यार्थी असतात - डॉ. अभिजात शेठ

## भारती विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालयाच्या वार्षिक संशोधन परिषदेचे उद्घाटन

**पुणे :** डॉक्टर हे आजीवन विद्यार्थी असतात त्यांनी सतत शिकत राहिले तरच ते अद्ययावत ज्ञान आत्मसात करून रोगाचे योग्य निदान लावून रुग्णांना सर्वोत्तम उपचार देऊ शकतात असे मत नॅशनल मेडिकल कमिशनचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी व्यक्त केले. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात एकविसाव्या वार्षिक संशोधन परिषदेच्या उदघाटन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह व प्र- कुलगुरु डॉ. विश्वजीत कदम व भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या



कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर, मेडिकल डायरेक्टर डॉ. संजय ललवाणी उपस्थित होते.

डॉ. शेठ पुढे म्हणाले, सर्वांसाठी आरोग्यव्यवस्था समप्रमाणात मिळण्यासाठी असंख्य डॉक्टरांची गरज समाजाला आहे. हे डॉक्टर्स तयार होत असताना त्यांना एक विशिष्ट कौशल्य प्राप्त झाल्याशिवाय पुढील सनद घेता येणार नाही,असे भविष्यात धोरण राबवण्याचा मानस असून त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्ता टिकवून राहण्यास मदत होईल. डॉ. विवेक सावजी म्हणाले, आंतरविद्याशाखीय संशोधन हे महत्वाचे असून येत्या काळात विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांनी चौकटीच्या बाहेर जाऊन संशोधन करायला हवे.

डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना शहरी भागाप्रमाणेच वैद्यकीय सुविधा मिळायला हव्यात. येणाऱ्या काळात डॉक्टरांची संख्या अधिक वाढल्यास ही दरी भरून निघण्यास मदत होईल.

यावेळी पस्तीस वर्ष वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापन करून अनेक डॉक्टर्स घडविणाऱ्या डॉ. मीरा मोडक व डॉ. अरुंधती दिवाण यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेसाठी देशभरातून जवळपास तीनशे डॉक्टर्स उपस्थित राहणार असून वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाबद्दल विचारमंथन होणार आहे. यावेळी डॉ. करमरकर यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर करून डॉक्टरांनी केलेल्या संशोधन पेपर्सचाही उल्लेख केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते हॉस्पिटल मधील अद्ययावत करण्यात आलेल्या व नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या अद्ययावत विभागांचे उदघाटन करण्यात आले. परिषदेचे समन्वयक म्हणून डॉ. सुप्रिया बारसोडे, डॉ. जिग्रेश शहा, डॉ. महादेवन कुमार, डॉ. अनुराधा टोलपाडी, डॉ. कोमल सिंग यांनी काम पाहिले.

नवराष्ट्र
Pune | 14 March 2026 | Page 3

**वार्षिक परिषद** \ डॉ. अभिजात शेठ यांचे मत; भारती विद्यापीठात परिषदेचे उद्घाटन

# डॉक्टरांनी आजीवन विद्यार्थी राहून शिकावे

**पुणे, शहर प्रतिनिधी.** डॉक्टर हे आजीवन विद्यार्थी असतात त्यांनी सतत शिकत राहिले तरच ते अद्ययावत ज्ञान आत्मसात करून रोगाचे योग्य निदान लावून रुग्णांना सर्वोत्तम उपचार देऊ शकतात असे मत नॅशनल मेडिकल कमिशनचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी व्यक्त केले. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात एकविसाव्या वार्षिक संशोधन परिषदेच्या उदघाटन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह प्र-कुलगुरु डॉ. विश्वजीत कदम आणि भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर, मेडिकल डायरेक्टर डॉ. संजय ललवाणी, रविंद्रनाथ टागोर स्कूलच्या चेअरपर्सन स्वप्नाली कदम उपस्थित होते.



## वैद्यकीय गुणवत्ता टिकून राहण्यासाठी प्रयत्न

परिषदेचे समन्वयक म्हणून डॉ. सुप्रिया बारसोडे, डॉ. जिग्नेश शहा, डॉ. महादेवन कुमार, डॉ. अनुराधा टोलपाडी, डॉ. कोमल सिंग यांनी काम पाहिले. डॉ. शेठ पुढे म्हणाले, असंख्य डॉक्टरांची गरज समाजाला आहे. हे डॉक्टर्स तयार होत असताना त्यांना एक विशिष्ट कौशल्य प्राप्त झाल्याशिवाय पुढील सनद घेता येणार नाही,असे भविष्यात धोरण राबवण्याचा मानस असून त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्ता टिकेल. यावेळी पस्तीस वर्ष वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापन करून अनेक डॉक्टर्स घडविणाऱ्या डॉ. मीरा मोडक व डॉ. अरुंधती दिवाण यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

## रुग्णालयात अद्ययावत विभागांचे उद्घाटन

डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना शहरी भागाप्रमाणेच वैद्यकीय सुविधा मिळायला हव्यात. येणाऱ्या काळात डॉक्टरांची संख्या अधिक वाढल्यास ही दरी भरून निघण्यास मदत होईल. डॉ. करमरकर यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर करून डॉक्टरांनी केलेल्या संशोधन पेपर्सचाही उल्लेख केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते हॉस्पिटल मधील अद्ययावत करण्यात आलेल्या आणि नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या अद्ययावत विभागांचे उदघाटन करण्यात आले.

# डॉक्टर ज़िंदगी भर सीखते रहते हैं:डॉ. अभिजात शेठ

## भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज की सालाना रिसर्च कॉन्फ्रेंस का उद्घाटन



**पुणे।** नेशनल मेडिकल कमीशन के चेयरमैन डॉ. अभिजात शेठ ने कहा कि डॉक्टर ज़िंदगी भर सीखते रहते हैं और अगर वे सीखते रहेंगे, तभी वे लेटेस्ट जानकारी हासिल कर पाएंगे, बीमारी का सही पता लगा पाएंगे और मरीज़ों को सबसे अच्छा इलाज दे पाएंगे। वे भारती विद्यापीठ के मेडिकल कॉलेज के ऑडिटोरियम में 21वीं सालाना रिसर्च कॉन्फ्रेंस के उद्घाटन समारोह में बोल रहे थे। इस मौके पर वाइस चांसलर डॉ. विवेक सावजी, एक्टिंग और प्रो-वाइस चांसलर डॉ. विश्वजीत कदम और भारती विद्यापीठ हेल्थ साइंसेज की एग्जीक्यूटिव डायरेक्टर डॉ. अस्मिता जगताप, प्रिंसिपल डॉ. मंदार करमरकर, मेडिकल डायरेक्टर डॉ. संजय लालवानी मौजूद थे। डॉ. विवेक सावजी ने कहा कि इंटरडिसिप्लिनरी रिसर्च ज़रूरी है और आने वाले समय में स्टूडेंट्स, टीचर्स और रिसर्चर्स को लीक से हटकर रिसर्च करनी चाहिए। डॉ. विश्वजीत कदम ने कहा कि शहरी इलाकों के मुकाबले ग्रामीण इलाकों में मेडिकल सुविधाओं की कमी है। इसलिए, ग्रामीण इलाकों में मरीज़ों को शहरी इलाकों की तरह मेडिकल सुविधाएं मिलनी चाहिए। अगर आने वाले समय में डॉक्टरों की संख्या बढ़ती है, तो यह कमी पूरी हो जाएगी। इस मौके पर, पैंतीस साल से मेडिकल कॉलेज में पढ़ाने वाली और कई डॉक्टर तैयार करने वाली डॉ. मीरा मोदक और डॉ. अरुंधति दीवान को जाने-माने लोगों ने सर्टिफिकेट देकर सम्मानित किया।

लोकमत

मस्ट READ

# डॉक्टर हे आजीवन विद्यार्थी असतात : डॉ. शेठ

पांडुरंग मरगजे

**भारती विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयात वार्षिक संशोधन परिषदेचे उद्घाटन**



एकविसाव्या वार्षिक संशोधन परिषदेच्या उद्घाटन समारंभप्रसंगी उपस्थित मान्यवर.

**धनकवडी :** डॉक्टर हे आजीवन विद्यार्थी असतात. त्यांनी सतत शिकत राहिले तरच ते अद्ययावत ज्ञान आत्मसात करून रोगाचे योग्य निदान करुन रुग्णांना सर्वोत्तम उपचार देऊ शकतात, असे मत राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी व्यक्त केले. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात एकविसाव्या वार्षिक संशोधन परिषदेच्या उद्घाटन समारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह व प्र-कुलगुरू डॉ. विश्वजित कदम व भारती विद्यापीठ आरोग्य शास्त्रांच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर, वैद्यकीय संचालक डॉ. संजय ललवाणी उपस्थित होते.

डॉ. शेठ म्हणाले, सर्वासाठी आरोग्यव्यवस्था सम प्रमाणात मिळण्यासाठी असंख्य डॉक्टरांची गरज समाजाला आहे. हे डॉक्टर तयार होत असताना त्यांना एक विशिष्ट कौशल्य प्राप्त झाल्याशिवाय पुढील सनद घेता येणार नाही, असे भविष्यात धोरण राबवण्याचा मानस आहे. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्ता टिकवून राहण्यास मदत होईल.

डॉ. विवेक सावजी म्हणाले, आंतरविद्याशाखीय संशोधन हे महत्त्वाचे असून, येत्या काळात विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांनी चौकटीच्या बाहेर जाऊन संशोधन करायला हवे. डॉ. विश्वजित कदम म्हणाले, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना शहरी भागाप्रमाणेच वैद्यकीय सुविधा मिळायला हव्यात. येणाऱ्या काळात डॉक्टरांची संख्या अधिक वाढल्यास ही दरी भरून निघण्यास मदत होईल.

यावेळी डॉ. मीरा मोडक व डॉ. अरुंधती दिवाण यांचा गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेसाठी देशभरातून जवळ पास तिनशे डॉक्टर उपस्थित राहणार असून, वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाबद्दल विचारमंथन होणार आहे.

दैनिक
चालु वार्ता
Powered by epaper.chaluwartha.com
15 Mar 2026 - Page 3

# डॉक्टर हे आजीवन विद्यार्थी असतात - डॉ. अभिजात शेठ

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**
**पुणे - प्रतिनिधी**
**अनिल पाटणकर**

**पुणे :** डॉक्टर हे आजीवन विद्यार्थी असतात त्यांनी सतत शिकत राहिले तरच ते अद्ययावत ज्ञान आत्मसात करून रोगाचे योग्य निदान लावून रुग्णांना सर्वोत्तम उपचार देऊ शकतात असे मत नॅशनल मेडिकल कमिशनचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी व्यक्त केले. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात एकविसाव्या वार्षिक संशोधन परिषदेच्या उदघाटन समारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह व प्र- कुलगुरु डॉ. विश्वजीत कदम व भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालिका डॉ.अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर, मेडिकल डायरेक्टर डॉ. संजय ललवाणी, रविंद्रनाथ टागोर स्कूलच्या चेअरपर्सन स्वप्नाली कदम उपस्थित होते.



डॉ. शेठ पुढे म्हणाले, सर्वांसाठी आरोग्यव्यवस्था समप्रमाणात मिळण्यासाठी असंख्य डॉक्टरांची गरज समाजाला आहे. हे डॉक्टर्स तयार होत असताना त्यांना एक विशिष्ट कौशल्य प्राप्त झाल्याशिवाय पुढील सनद घेता येणार नाही, असे भविष्यात धोरण राबवण्याचा मानस असून त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रात गुणवत्ता टिकवून राहण्यास मदत होईल. तर डॉ. विवेक सावजी म्हणाले, आंतरविद्याशाखीय संशोधन हे महत्वाचे असून येत्या काळात विद्यार्थी, शिक्षक व संशोधक यांनी चौकटीच्या बाहेर जाऊन संशोधन करायला हवे. याप्रसंगी बोलताना डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधांचा अभाव आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील रुग्णांना शहरी भागाप्रमाणेच वैद्यकीय सुविधा मिळायला हव्यात. येणाऱ्या काळात डॉक्टरांची संख्या अधिक वाढल्यास ही दरी भरून निघण्यास मदत होईल. यावेळी पस्तीस वर्ष वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापन करून अनेक डॉक्टर्स घडविणाऱ्या डॉ. मीरा मोडक व डॉ. अरुंधती दिवाण यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेसाठी देशभरातून जवळपास तीनशे डॉक्टर्स उपस्थित राहणार असून वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाबद्दल विचारमंथन होणार आहे. यावेळी डॉ. करमरकर यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर करून डॉक्टरांनी केलेल्या संशोधन पेपर्सचाही उल्लेख केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते हॉस्पिटल मधील अद्ययावत करण्यात आलेल्या व नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या अद्ययावत विभागांचे उदघाटन करण्यात आले. परिषदेचे समन्वयक म्हणून डॉ. सुप्रिया बारसोडे, डॉ. जिग्नेश शहा, डॉ. महादेवन कुमार, डॉ. अनुराधा टोलपाडी, डॉ. कोमल सिंग यांनी काम पाहिले.

# वैद्यकीय पदव्युत्तरच्या जागांत वाढ

## राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांची घोषणा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'देशात वैद्यकीय पदवीच्या तुलनेत पदव्युत्तर जागांचे प्रमाण जवळपास निम्मे आहे. ब्रिटनसारख्या देशात हे प्रमाण दोन पदव्युत्तर जागांमागे एक पदवीची जागा, असे आहे. देशात आगामी काळात पदव्युत्तरच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढविण्यात येऊन पदव्युत्तर आणि पदवीच्या जागांचे गुणोत्तर एकास एक होईल,' अशी घोषणा राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. अभिजात शेठ यांनी शुक्रवारी केली.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने आयोजित एकविसाव्या वार्षिक संशोधन परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. शेठ बोलत होते. कुलगुरू डॉ. विवेक सावजी, कार्यवाह व प्र-कुलगुरू डॉ. विश्वजित कदम, भारती विद्यापीठ हेल्थ सायन्सेसच्या कार्यकारी संचालक डॉ. अस्मिता जगताप, प्राचार्य डॉ. मंदार करमरकर आणि रवींद्रनाथ टागोर स्कूलच्या अध्यक्ष स्वप्नाली कदम आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. शेठ म्हणाले, 'भारतात पदवीच्या तुलनेत पदव्युत्तरच्या जागा कमी आहेत. अमेरिकेत पदव्युत्तर-पदवी जागांचे गुणोत्तर १.५:१ आहे. आपल्याकडे पदवीच्या तुलनेत पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यांची संख्या निम्म्याने कमी आहे. पूर्वी पदवी घेतलेल्या डॉक्टरला सर्व येते, अशी धारणा होती. आता काळानुसार सुपर स्पेशालिटी शाखा वाढत आहेत. त्यामुळे पदव्युत्तर डॉक्टरांची मागणी वाढत आहे. त्यातून प्रत्येक पदवीधर डॉक्टरला पदव्युत्तरची संधी उपलब्ध करून देण्याचे पाऊल उचलण्यात येईल. त्याने पदव्युत्तर करावे की नाही, हा शेवटी त्याचा प्रश्न असेल. मात्र, या दृष्टीने आपण पायाभरणी करणार आहोत.'

'वैद्यकीयच्या २० हजार जागा वाढविण्यात आल्या आहेत. जागा वाढल्याने प्रवेश मिळविणारे आनंदी आहेत, तर काही जण गुणवत्ता कमी होईल, अशी शंका व्यक्त करत आहेत. संख्या वाढल्याने दर्जावर परिणाम होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. भविष्यात संख्या वाढविली, तरी त्याची गुणवत्तेशी सांगड आपल्याला घालावी लागेल. देशात डॉक्टरांची संख्या सगळीकडे समसमान नाही. काही ठिकाणी जास्त, तर काही ठिकाणी अतिशय कमी डॉक्टर आहेत. डॉक्टरांची संख्या वाढविण्याचे पाऊल आपण उचलले आहे. त्यांना शिक्षण देताना दर्जावर लक्ष देण्याची जबाबदारीही आपली आहे,' असे डॉ. शेठ यांनी नमूद केले.




### आयोग 'पंचिंग बॅग'

'राष्ट्रीय वैद्यकीय आयोग हा सर्वांसाठी 'पंचिंग बॅग' बनला आहे. प्रत्येक गोष्टीतील त्रुटींसाठी आयोगाकडे बोट दाखविले जाते. हे करताना सर्वांनी या एकूण व्यवस्थेचा विचार करायला हवा. महाविद्यालयांनी अथवा वैद्यकीय क्षेत्राने आयोगावर टीका करताना आपणही त्याचा घटक आहोत, याचे भान राखावे. तुम्ही या क्षेत्राचे भागीदार असल्याने काही गोष्टींसाठी तुम्हीही जबाबदार आहात. धोरणांवर टीका आणि चर्चा व्हायला हवी. परंतु, प्रत्येकाने आपली जबाबदारीही विसरू नये,' असे डॉ. अभिजात शेठ यांनी स्पष्ट केले.